शुक्रवार, दि. ५ सप्टेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २० वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## आदिवासी समाजातील नागरिकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करावेत - जिल्हाधिकारी



**जालना । प्रतिनिधी -** केंद्र शासनाच्यावतीने प्रधानमंत्री धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत आदि कर्मयोगी अभियान योजनेच्या माध्यमातून जालना जिल्ह्यातील २४ गावातील आदिवासी समाजाच्या नागरिकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करावेत असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहत आयोजित प्रधानमंत्री धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान बैठकी दरम्यान त्या बोलत होत्या. यावेळी बैठकीस जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिन्नू पी. एम., जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती सविता चौधर, उप मुख्य कार्यकारी पंचायत उदयसिंग राजपूत, उप मुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन आर. डी. तुबाकले, उप मुख्य कार्यकारी अधिकारी पाणी पुरवठा व स्वच्छता एल. बी. बारगिरे, प्रकल्प अधिकारी श्रीमती चेतना मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी संबंधित विभागातील अधिकारी यांना सदर योजनेंतर्गत पुढील प्रमाणे सामुहिक विकासाच्या योजना राबविणे अपेक्षीत असल्याचे सांगितले. यामध्ये आवास योजना, जल अपुर्ती साधने विहिरी, हॅन्डपंप, ट्युबवेल, पाण्याच्या टाक्या, जलाशये, नहरे इत्यादी, आरोग्य व पोषण, शिक्षण, रस्ते व दळणवळण, वीजेची जोडणी, सामुदायीक व धार्मिक सुविधा मध्ये मंदीर, मस्जिद, चर्च किंवा अन्य धार्मिक स्थळे विकास, दूरसंचार साधनामध्ये टपालघर, टेलीफोन बुथ, मोबाईल टॉवर, रेडीयो सूचना बोर्ड, बाजारपेठ व व्यापार साधने, पान २ वर

## राज्यस्तरीय सिनीयर टेनिक्काईट स्पर्धे साठी निवड चाचणीचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र टेनिक्काईट असोसिएशनच्या वतीने दिनांक १३ ते १५ सप्टेंबर २०२५ दरम्यान नांदेड येथे सिनीयर राज्य टेनिक्काईट अजिंक्यपद स्पर्धा २०२५-२६ चे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर स्पर्धेत सहभागी होण्याकरीता जालना जिल्हा टेनिक्काईट असोसिएशनच्या वतीने दिनांक ८ सप्टेंबर २०२५ सोमवार रोजी निवड चाचणीचे आयोजन शिशु विहार इंग्लिश स्कुल, जालना येथे सकाळी ११ वाजल्यापासुन करण्यात आलेले आहे.



सदर निवड चाचणीमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडुंना जन्म तारखेचे बंधन नाही तसेच निवड चाचणीत सहभागी होण्याकरीता कोणतेही प्रकारचे शुल्क आकारण्यात येणार नाही. सदर निवड चाचणीतुन ६ मुले व ६ मुलींची निवड करण्यात येईल व हे खेळाडु राज्यस्तर स्पर्धेत जालना जिल्ह्याचे नेतृत्व करतील. टेनिक्काईट हा खेळ शालेय स्पर्धांमध्ये सहभागी असुन दहावी व बारावीत असणाऱ्या खेळाडुंना ग्रेस मार्क करिता पात्र आहे. अधिक पान २ वर



जालना शहरातील राजेंद्र प्रसाद रोडसह विविध भागात गणेश मंडळांनी आकर्षक गणपतींची मुर्ती वेगवेगळ्या रुपात असून ही पाहण्यासाठी मोठी गर्दी होत आहे.




जश्ने ईद मिलादुन्नबीनिमित्त जुना जालना येथील दुःखी नगर भागात अशी विद्युत रोषणाई करण्यात आली. (छाया - जावेद तंबोली)

## नाना पाटेकर यांच्या निवासस्थानी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी घेतले गणरायाचे दर्शन



**जालना । प्रतिनिधी -** सुप्रसिद्ध सिने अभिनेते, पद्मश्री पुरस्कार सन्मानित व नाम फाउंडेशनचे अध्यक्ष नाना पाटेकर यांच्या सिंहगड,पुणे येथील निवासस्थानी शिवसेनेचे जालना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी सदिच्छा भेट देत गणपती बाप्पाचे दर्शन घेतले, तसेच नाना पाटेकर यांचा मनोभावे सत्कार केला. या प्रसंगी नाम फाउंडेशनचे मराठवाडा समन्वयक राजाभाऊ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्य सुभाषराव बोडके, उपजिल्हाप्रमुख प्रवीण पाटील फुके, तसेच कैलासराव जगताप यांची उपस्थिती होती.

गणेशोत्सवानिमित्त स्नेहभेट व सामाजिक संवाद या भेटीदरम्यान गणरायाचे दर्शन घेत, सामाजिक प्रश्नांवर व नाम फाउंडेशनच्या कार्यपद्धतीवर सकारात्मक चर्चा झाली. ग्रामीण भागातील पाणीटंचाई, शेतीविषयक अडचणी, आणि शेतकऱ्यांसाठी फाउंडेशन करत असलेल्या कार्याबाबत अनुभव व विचारांची देवाण-घेवाण झाली. पान २ वर

## संपादकीय

# मराठा आंदोलन; थांबलेला संघर्ष, पण न विझलेली लढाई

मुंबई; काँक्रीटच्या जंगलात हरवलेले, नित्याचा दगदगीचा रटाळपणा जगणारे आणि धावपळीने श्वास घेणारे हे शहर. या शहराच्या सवयीप्रमाणे इथला नागरिक उठतो, लोकल पकडतो, कामावर जातो, परततो आणि पुन्हा झोपतो. जीवनमानाचा वेग प्रचंड असला तरीही त्यात एकसुरीपणा आहे. अशा या शहराला गेल्या काही दिवसांत मराठा आंदोलनाने जणू नवसंजीवनी दिली. इतिहासाची आठवण करून देणाऱ्या स्वरूपात सांगायचे झाल्यास तीनशे वर्षांपूर्वी मराठ्यांनी ताजमहालात घोडे बांधले होते अशी उक्ति गाजवणाऱ्या मराठ्यांनी, या वेळी मुंबईच्या हृदयस्थानी आपला ठसा उमटवला. पुलांना झोके बांधले गेले, समुद्रकिनाऱ्यावर भांडी धुतली, गेट वे आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनससमोर कबड्डी, कुस्ती, खो-खो ते क्रिकेट खेळले गेले. दहीहंडीचा उत्साह, पाट्या-सूरपाट्या यांचा जल्लोष, ढोल-ताशांचा गजर आणि हलग्यांच्या निनादाने मुंबईचा आत्मा हलवून सोडला. झोके, कबड्डी, खो-खो, दहीहंडी, ढोल-ताशे, पंगती, पोलिसांनाही या जल्लोषात ओढून घेतले गेले, तेही आनंदात थिरकले. महापालिकेसमोर सामूहिक अंघोळी झाल्या, रेल्वे स्थानकांवर पंगती बसवल्या. बॅरिकेट्सच्या गाड्याही बनल्या. हे सर्व पाहतांना आंदोलनाला आलेली एक आगळीवेगळी ऊर्जा जाणवते. या सर्व कृती मागे असलेला संदेश सरळ आणि सोपा होता. आम्ही केवळ मागणी करत नाही, आम्ही जगण्याचा अर्थ नव्याने सांगतो आहोत. हे विरोध करणाऱ्यांनी समजायला हवे होते.

मराठा आंदोलनाने दाखवून दिले की, आंदोलन हे केवळ घोषणांनी किंवा मोर्चाने मर्यादित नसते; ते संस्कृतीचे, परंपरेचे, सामाजिक ऐक्याचे दर्शन घडवते. मुंबईसारख्या यांत्रिक जीवनशैलीत या आंदोलनाने लोकांना क्षणभर थांबवले, विचार करायला लावले आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सामाजिक न्याय या प्रश्नाभोवती जनजागृती निर्माण केली.

काहींनी हे उत्पात म्हणत विरोध केला. पण खरा उत्पात कोणाचा? मराठ्यांच्या घामावर पाणी फ ेरणाऱ्या सरकारचा! वेळकाढूपणा करणाऱ्या मंत्र्यांचा! आश्वासन देऊन फाईल गाडणाऱ्या समित्यांचा! प्रश्न विचारणाऱ्यांनी आधी सरकारला विचारायला हवे होते, मराठा तरुणांना नोकरी का मिळत नाही?, शिक्षणात संधी का नाही?, शेतकऱ्यांचा मुलगा आजही आंदोलनात उपाशी का बसतो? पोट भुकेले असेल तर तो रेल्वे स्टेशनवर बसूनही जेवेल. घाम गाळून आंदोलन करणारं शरीर रस्त्यावरसुद्धा अंघोळ करेल. हे दोष नाहीत, तर सरकारच्या निष्क्रीयतेचा आरसा आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मराठ्यांना न्याय देऊ असे आश्वासन दिले होते, ते आश्वासन कुठे गेले, आज फक्त कायद्याचे हवाले देता. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, तुम्ही शिवसेनेचे वारस म्हणवता पण शिवरायांच्या वंशजांचे अश्रू पुसायला तयार नाही. उपमुख्यमंत्री अजित पवार, तुम्ही सत्ता टिकविण्यासाठी प्रत्येक वेळी हात बदलता, पण मराठा तरुणांच्या भवितव्यासाठी हात पुढे का करत नाहीत?

मुंबईत झालेल्या आंदोलनाने दाखवले हा समाज थांबू शकतो, पण झुकणार नाही. होय, आंदोलन आता थांबले आहे. रस्त्यावरचे खेळ, ढोल, पंगती हे चित्र संपले. पण लढाई अजूनही बाकी आहे. मराठा सम ाजाने सरकारला मुदत दिली आहे. या मुदतीत जर सर्व काही मागण्यांप्रमाणे झाले नाही, तर पुन्हा आंदोलन पेटेल. आणि आता हे सरकारला माहीत आहे पहिल्या आंदोलनाने मुंबई हलली होती. आता पुन्हा आंदोलन पेटले, तर सरकार हादरेल. मराठा आंदोलनाने दाखवून दिले की, आंदोलन केवळ संघर्ष नसून सांस्कृतिक जल्लोषही असतो. पण त्याहून मोठा संदेश म्हणजे आम्ही मागण्या पूर्ण होईपर्यंत शांत बसणार नाही. आता पुन्हा आंदोलन सरकारला परवडणारे नाही.

**- दीपक शेळके**

# आजच्या आणि पूर्वीच्या शिक्षकातील सरस निरसता

आजचे शिक्षक हे पूर्वीच्या शिक्षकांपेक्षा सरस आहेत का? हे सांगणे खूप अवघड झाले आहे. आधी पण शिक्षक चांगले होते आणि आता सुद्धा शिक्षक चांगले आहेत. प्रत्येक नोकरी प्रमाणे काही शिक्षक आधी पण चांगले नव्हते आणि आता सुद्धा चांगले नाहीत. आधी शिक्षकांना तुटपुंज्या पगारावर काम करावे लागायचे आणि पदोन्नतीच्या संधी कमी होत्या. पण आता तसे नाही. शिक्षकांना चांगला पगार आहे. पदोन्नतीच्या संधीही उपलब्ध आहेत. कार्यक्षम आणि मेहनत घेणा-या व्यक्तींची नेमणूक होण्याची गरज आहे. शिक्षक हा आपल्या ज्ञानार्जनातून पिढी घडवत असतो. म्हणून फक्त सर्वोत्तम व्यक्तींनीच या क्षेत्रात उतरावे.

पण दुर्दैवाने नेमणुका करतांना बोकाळलेला भ्रष्टाचार बघता नवीन रुजू होणारे बहुतांशी शिक्षक पैसा देऊन ती नोकरी विकत घेत असतात. मग लाखो रुपये देऊन नोकरीला लागलेल्या शिक्षकांकडून तो चांगले शिकविल ही अपेक्षा आपण कशी करावी? चांगला पगार आहे, सर्वोत्तम व्यक्तींची निवड करून नेमणूक केली, तर विद्यार्थ्यांना चांगले शिक्षक मिळतील. पण तसे होताना दिसत नाही. इतर नोकरीत आठवड्यात ४० तास काम करावे लागते. तुलनेत शिक्षकांना काम कमी असते. शिक्षकांनी त्या फावल्या वेळेचा उपयोग स्वतःला अद्यावत करण्यासाठी वापरावा ही अपेक्षा असते. त्यांचे काही मित्र विद्यापीठाच्या अभ्यासक्रम मंडळात आहेत. अभ्यासक्रम बदलायचा तथा अद्यावत करण्याचा प्रयत्न केला तर प्राध्यापक मंडळी विरोध करतात. कशाला आमचे काम वाढवता असे त्यांचे म्हणने असते. कारण कधीतरी दहा-पंधरा वर्षांपूर्वी एखाद्या हुशार विद्यार्थ्याने तयार केलेल्या नोट्स वापरून शिकवण्याची सवय झालेली असते.

आज फार फरक दिसून येतो. निश्चितपणे चांगल्याकडून वाईटपणाकडे झाला आहे. शिक्षकातील काहीजण त्यांच्या वागण्यामुळे मान देण्यास पात्र नाहीत, तर अट्टल गुन्हे आणि गैरवर्तन करणारे आहेत. शिक्षक म्हणून पदाचा गरिमा म्हणजे पदाचा आब राखणे, पदाची गरज, पावित्र्य व शान राखणे हे खरे तर त्यांचे कर्तव्य आहे. पण यातच अनेक जण वाईटरित्या उघडे पडतात. जसे दारू पिऊन मुलांसमोर येणे, आश्रम शाळेत मुलींबरोबर बलात्कार करणे, व्यसन करणे, शाळांतील पैसा खाणे, न शिकवणे, वाईट भाषा वापरणे, पेपर फोडणे, पैसे घेऊन मार्क देणे, मुलांकडून घरची कामे करून घेणे, बेशिस्त वर्तन, म ुलींना फुस लावून पळवून नेणे अशा काही प्रकरणातून त्यांचे गुण उघड होताना दिसून येते.

जर शिक्षक त्यांचे काम व्यवस्थित करत नसतील तर त्यांना सरळ टर्मिनेट करावे. कारण शिक्षकच आता खोट्या गोष्टी करून, भ्रष्टाचार करून टीईटी देतात. त्यात खोटेपणा करतात. आता शिक्षकांना परीक्षा नको म्हणतात. मुलांच्या खोट्या हजेरी लावून पगार घेणे, मुलींशी गैरवर्तन करणे असे सर्व दुर्गुण हल्ली त्यांच्यात भरले आहेत. हे पेपर मध्ये येणा-या विविध बातम्या वाचून कळते. खांद्यावर हात ठेवणे हे त्या व्यक्तीचे गुण जेव्हा मुलांसमोर येतात तेव्हा आदर्शच असावे. जसे तोंडात पानाचा तोबरा, हातात सिगरेट हे सर्व चुकीचे आहे. त्यांच्या वागण्यामुळे आज असे करणारे शिक्षक त्यांचा मान सन्मान हरवून बसले आहेत आणि आदरयुक्त मानसन्मान मिळवणे नाही, तर नाव कमावणे ही पूर्णपणे त्यांचीच जबाबदारी आहे.

पूर्वी शाळेतला शिक्षक सोडला, तर इतर कुठूनही ज्ञान मिळण्याची व्यवस्था नव्हती. आई-वडील शिकलेले असतील तर थोडी मदत होत असे. पण मुलांना शिकवण्याचा पूर्ण भार शाळेवर होता. एकदम 'ढ' विद्यार्थी शिकवणी लावायचा. यामुळे इतर मुलं चिडवायची आणि ते पालकांना परवडत सुध्दा नव्हते. पूर्वी शिक्षा करण्याचा अधिकार होता. त्यामुळे शिक्षक मुलांना चोपून काढू शकत होते आणि घरी कळलं तर घरून वेगळा मार बसायचा. त्यामुळे मनात शिक्षकांविषयी भिती होती. गुरु म्हणजे देव असतो. शिक्षक कसाही असला तरी तो व्यक्ती आपल्याला ज्ञान देतो आहे, तो गुरु आहे असे संस्कार होते. त्यामुळे गुरु विषयी अपशब्द वापरले जात नव्हते. पूर्वी शिक्षक आपल्या कामाशी प्रामाणिक होते (सगळेच नाही पण मोठ्या प्रमाणात). ज्ञानदान करणे पुण्य कर्म मानले जायचे, त्यामुळे शिक्षणाचा दर्जा चांगला होता. कितीही वर्ष शिकवत असले तरी आपल्या विद्यार्थ्यांना हे शिक्षक ओळखू शकत होते. म्हणजे हजारो मुलांना शिकवलं तरी हा माझा विद्यार्थी असा प्रत्येकाशी त्यांचा भावनिक बंध होता. मुलांच्या मनात सुद्धा शिक्षकांविषयी प्रेम आणि आदर होता.

आताची परिस्थिती काय आहे? माहितीच्या उपलब्धतेमुळे माहिती सगळीकडे नदी सारखी वाहत आहे. मोबाईल उचलला की हवी ती माहिती मिळते. मग शिक्षक कशाला हवे? शिवाय शिकवणी वर्ग आहेतच की जिथे पैसे भरून ज्ञान मिळवता येतं. शाळेत का लक्ष द्यायचं? मुलांना काही म्हणण्याची मुभा नाही. मारणे तर दुरच मुलांना शिस्त लावण्यासाठी काही बोलणे सुध्दा शिक्षकांना कठीण होऊन बसले आहे. लगेच पालक शाळेत धावून जातात. त्यामुळे नोकरी जाण्याची भिती असते. आजकाल शिक्षक सर्विस देतो, ज्ञान नाही. अभ्यासक्रम पूर्ण करणे, मुलांचे मनोरंजन करणे आणि त्यांना परिक्षा उत्तीर्ण करण्यासाठी मदत करणे हे आजच्या शिक्षकाचे काम आहे. मी शाळेत जातो, दिलेला तास शिकवतो आणि पगार घेतो. मुलांच्या भविष्याशी माझे काही देणे घेणे नाही. पालक सरळ असे म्हणतात की, असा कसा माझा मुलगा-मुलगी नापास झाले. काय शिकवता तुम्ही? पैसे भरले आहेत तर मुलं पास झालीच पाहिजे. अशाप्रकारे पालकांची अरेरावी वाढत जात आहे.

ही झाली वरवरची कारणे, तर मुळ मुद्दा काय आहे? आजकाल ज्ञान फार कमी मुलांना हवं आहे. मुलांना फक्त पदवी प्राप्त करायची आहे. असं का? तर आपला अभ्यासक्रम फार जूना आहे, नवीन गोष्टी त्यात शिकवल्या जात नाहीत. एक इंजिनिअर जेव्हा पदवीधर होतो तेव्हा बरेचदा त्याला नोकरीवर जे काम करायचे आहे ते येतच नसते, ते शाळा, कॉलेज मध्ये शिकवले नसते. त्यासाठी कंपनीत वेगळे प्रशिक्षण देण्यात येते. मग शिक्षक जे शिकवतो त्याचा उपयोग काय? ऐकलं काय आणि नाही ऐकलं काय सारखंच. फक्त नावापुरतेच तास करायचे, शिकवणी वर्ग लावायचे आणि उत्तीर्ण झाले की काम झालं.

आजकाल मुलं शाळेत, महाविद्यालयात मौजमजा करण्यासाठी जातात. काही नावाजलेले शाळा-कॉलेज सोडली, तर इतर ठिकाणी नुसता बाजार भरला आहे. ग्रामीण भागातील सरकारी शाळेत शिकलेल्या मुलांना साधं अक्षर ज्ञानसुध्दा नसतं. ती मुलं शाळेत जातात ते विविध योजनेतून तांदूळ, जेवण मि ळवण्यासाठी आणि शिक्षक येतात ते पगारासाठी. यातूनही जर एखादा शिक्षक शिस्त लावण्याचा प्रयत्न करतो, तर शाळा, कॉलेज प्रशासन त्यांनाच बाहेरचा रस्ता दाखवतात. काही ठिकाणी रेटिंग सिस्टीम असते, म्हणजे वर्ष अखेरीस मुलं आपल्या शिक्षकांबद्दल फिडबॅक देतात. ते शिक्षक चांगले आहेत की नाही वैगरे. या रेटिंगवर शिक्षकांचे वेतनवाढ, पदोन्नती या गोष्टींचे निर्णय घेण्यात येतात. मग शिक्षक का मुलांशी पंगा घेईल? शिक्षक मग मि त्रांसारखाच वागेल ना.



जेव्हा दोन मुलं अभियांत्रिकीला असताना एक सिनीयर असतो, जो दरवर्षी नापास होतो आणि शेवटच्या वर्षाची परीक्षा सोबत देते, ते त्यातही नापास होते. चार वर्षांची अभियांत्रिकीची पदवी त्यांनी आठ वर्षांत मिळवली. आज ते एका पोलीटेक्निक विद्यालयात शिक्षक आहेत. मी असं म्हणत नाही की ते शिकवू शकत नाही. ते मुलांना भरपूर इंटर्नल मार्क्स देतात. मुलांसोबत त्यांचे फोटो फेसबुकवर सतत येत असतात आणि त्यांना दरवर्षी छान रेटिंग मिळतं. अशी देवाण घेवाण चालते.

बाकी शिक्षणाचा खेळ खंडोबा झाला आहे. शेवटी काय? दोष फक्त शिक्षकांचा नाही, तर सिस्टीमचा आहे. पण राजकारणी लोक जोपर्यंत शाळा, कॉलेज चालवतील तोपर्यंत बदलाची शक्यता आहे का? निश्चितच नाही.

**शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली,यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९**

## युवा आदर्श
### अनुभव शिक्षक ...

शिक्षक नसे दुजा
रे अनुभवा सारखा
सावरत जातो नीत
पाठी राही सारखा
सिध्द होते अनुभवे
माणूस जरी नवखा
व्यथा वृथा सतावते
घालवे व्याधी अवखा
परिस्थिती ठरविते
कोण आप्त परका
अनुभवा वाचूनि बा
विद्यार्थी बने पोरका
घंटा वाजे मनामध्ये
धोका वेळी ओळखा
वाटेवरती काटे कुटे
पायी पडेल विळखा
पुढे झेप घेण्याआधी
मागे जरासे सरका
मन कराया धष्टपुष्ट
अनुभव या खारका
ठेचा खाता दोनचार
सिध्द होई नवशिका
जगताचे विद्यापीठा
मृत्यू येईपर्यंत शिका
अनुभव हो शुभभव
उजळी लाख तारका
शिक्षक हा अनुभव
वंद्य हवासा सारखा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## पान १ वरुन

### आदिवासी समाजातील ...

स्वच्छतागृहे, सामुदायीक शौचालये, मलनिस्सारण योजना, कृषि सहायता मध्ये पशुशाला, अन्न गोदाम, सिंचन पंपाचे दुरुस्ती, मनोरंजन यामध्ये खेळ मैदान, सांस्कृतिक सण साजरे करण्याचे ठिकाण, मोकळे मैदानाचा विकास सेवा साधने यांचा लाभ संबंधित लाभार्थींना उपलब्ध करून देण्यात आल्याचे सांगितले.

तसेच तालुका मास्टर ट्रेनरची नियुक्ती करून जिल्हा प्रोसेस लॅब गठीत करणे, अनुसूचित जमाती मधील विद्यार्थांसाठी वसतीगृह उभारणीचे प्रस्ताव शिक्षणाधिकारी प्राथमिक यांना सादर करणेबाबत निर्देश दिले, दूरसंचार विभागाने संबंधित गावामध्ये दूरसंचार जोडणीबाबत तातडीने सर्वेक्षण करून प्रस्ताव सादर करावा. सदरील कार्यक्रमाशी संबंधित सर्व सहभागी यंत्रणांनी एकत्रितपणे गावनिहाय शिबीरांचे आयोजन करुन, लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळवून द्यावा. आदिवासी समाजातील कलागुणांना वाव देण्यासाठी विशेष मोहीम राबविणेबाबतच्या सूचना ही श्रीमती मित्तल यांनी यावेळी दिल्या.

यावेळी तहसीलदार परतुर श्रीमती प्रतिभा गोरे, जिल्हा कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, शिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती संगिता भागवत, गटविकास अधिकारी परतुर एन.टी.खिल्लारे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी आय. सी. डी. एस. श्रीमती कोमल कोरे, गटविकास अधिकारी भोकरदन महेंद्र साळवे, गटविकास अधिकारी अंबड श्रीमती ज्योती लबडदेवी, गटविकास अधिकारी बदनापूर श्रीमती ज्योती राठोड, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन डॉ. पी. डी. चौधरी, कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद जालना पी. बी. बनसावडे, उप कार्यकारी अभियंता डी. पी. घोरपडे, सहा आयुक्त पंचायत डॉ. सु. दी. माने, मेढाचे व्यवस्थापक एन. जी. जगताप, शिक्षण विस्तार अधिकारी डॉ भरत वानखेडे, भागवत कदम, श्रीमती माने मॅडम, सोमनाथ थोरवे, भारत चव्हाण, श्रीमती अनुपमा मस्के, बिराप्पा पाटील, श्री बोराडे यांच्यासह अन्य विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### राज्यस्तरीय सिनीयर ...

माहितीकरीता संघटनेचे शेख चाँद पी.जे. मो.नं. ९८२२४५६३६६, जिल्हा प्रशिक्षक उमेश खंदारकर, तुषार गर्जे, संतोष वाघ, नागेश वराडे, नितीन जाधव, शेख समीर, सोहेल खान, श्रीमती किरण पाटील, यांच्याशी संपर्क साधावा. तरी सदर सुवर्ण संधीचा जालना जिल्हयातील खेळाडुंनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा टेनिक्राईट असोसिएशन जालनाचे अध्यक्ष नगरसेवक जयंत भोसले, प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे, देवगिरी विद्या प्रतिष्ठाणचे अध्यक्ष बबन दादा सोरटी, गणपती एज्युकेशन कॅम्पसचे अध्यक्ष ज्ञानेश्वर पुगंळे, क्रीडा अधिकारी श्रीमती लता लोंढे, क्रीडा मार्गदर्शक सिद्धार्थ कदम, आशीष जोगदंड, श्रीमती आरती चिल्लारे, तालुका क्रीडा संयोजक कृष्णा जंजाळ, प्रा. वाहेद पटेल, प्रा. शेख रफ ीक, भागवत कडुळे, गुलाब राठोड, प्रमोद राठोड, सचिन मोहीते, सुभाष पारे, श्रीमती सुनीता गवई, श्रीमती वैशाली सरदार, श्रीमती महेजबीन शेख, श्रीमती गिता संगम जालना जिल्हा टेनिक्राईट असोसिएशन जालना व जालना जिल्हा ऑलंम्पीक असोसिएशन यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### नाना पाटेकर यांच्या ...

भाऊसाहेब घुगे यांनी नाना पाटेकर यांच्याशी संवाद साधताना मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्या, शेतीसाठी जलसंधारण आणि रोजगाराच्या संधी यावर प्रकाश टाकला आणि या संदर्भातील कामांना पुढील पाठबळ देण्याची भूमिका मांडली.सत्कार आणि सदिच्छा भेट या विशेष प्रसंगी भाऊसाहेब घुगे यांनी नाना पाटेकर यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. नाना पाटेकर यांनीही त्यांच्या भेटीबद्दल समाधान व्यक्त केले आणि सामाजिक कामासाठी सातत्याने पुढे राहण्याचा संदेश दिला.

नाना पाटेकर यांचे कार्य आणि नाम फाउंडेशनच्या माध्यम ातून ग्रामीण भागातील गरजूंसाठी चालवलेले उपक्रम हे राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत, असे मत या प्रसंगी उपस्थित सर्वांनी व्यक्त केले.गणेशोत्सवाच्या पार्श्वभूम ीवर झालेली ही सदिच्छा भेट केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक आणि समविचारी कार्याच्या दृष्टिकोनातूनही महत्त्वपूर्ण ठरली. यामुळे शासकीय, सामाजिक संस्थांमधील समन्वय वाढवण्यास हातभार लागेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# जालना गणेश फेस्टिव्हलमध्ये घडले गौरवशाली सांस्कृतिक भारताचे दर्शन

## शर्वरी जेमिनीस, धनश्री काडगावकरांच्या नृत्यविष्काराने जालनेकरांची मने जिंकली






**जालना । प्रतिनिधी -** रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या जालना गणेश फेस्टिव्हलमध्ये बुधवारी ( दि. ३) गौरवशाली सांस्कृतिक भारताचे दर्शन घडले. स्व. कल्याणराव घोगरे क्रीडा संकुलावर जालना गणेश फेस्टिव्हल सुरू आहे. बुधवारी ( दि. ३) स्वप्नील रास्ते दिग्दर्शित ' गौरवशाली सांस्कृतिक भारत' हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाला. या कार्यक्रमात नृत्य व गीतांच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविण्यात आले. अभिनेत्री व नृत्यांगना शर्वरी जेमिनीस, तेजा देवकर, धनश्री काडगावकर,श्वेता परदेशी, नुपूर जोशी यांनी भारतातील विविध प्रांतातील लोकनृत्य पेश करून रसिकांची दाद मिळवली. ' डोला रे डोला मन डोला, बुमरोह बुमरोह शाम रंग बुमरोह, बलम सामे ' या गीतावर सादर झालेल्या नृत्यविष्काराने रसीकांची मने जिंकली. ' आले तारांगणी चंद्रा ' या लावणीवर रसिकांनी ठेका धरून भरभरून दाद दिली. याशिवाय ' निगाहे मिलाने को दिल चाहता है, प्यार किया तो डरना क्या' या गीतेवरील नृत्याविष्काराने जालनेकरांची मने जिंकली. भारतातील विविध प्रांतातील लोकनृत्य यावेळी सादर करण्यात आले. गायक सुजीत सोमण, अभिजीत पाटणकर व अमिता घुगरी यांनी ' मन पावन हो, गंगा मे नहाने, नमो नमोजी शंकरा, जयकाल महाकाल, मल्हार वारी मोतीयानी द्यावी भरून ' ही गीत सादर करून रसिकांना ठेका धरायला लावला.

**सांस्कृतिक कार्यक्रमातून एकोपा वाढतो**

या कार्यक्रमाची सुरुवात जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती वर्षा मोहिते यांच्या हस्ते श्रीफळ फोडून करण्यात आली. यावेळी न्यायाधीश श्रीमती शेख, श्रीमती मुजावर, श्रीमती कदम, श्रीमती पडुळीकर,श्रीमती पटेल तसेच जिल्हा सरकारी वकील बाबासाहेब इंगळे आदींची विशेष उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना श्रीमती वर्षा मोहिते म्हणाल्या की, जालना शहरात सुरू असलेला जालना गणेश फ ेस्टिव्हल हा रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करतोय, ही जालनेकरांसाठी अभिमानाची बाब आहे. सांस्कृतिक कार्यक्रमात जालना शहर हे अग्रेसर आहे, सांस्कृतिक कार्यक्रमातून सामाजिक एकोपा वाढीस लागतो, सांस्कृतिक कार्यक्रम हे ताण तणाव कमी करतात, सांस्कृतिक कार्यक्रम सातत्याने आयोजित करायला हवे, असे त्यांनी सांगितले. यावेळी जालना गणेश फ ेस्टिव्हलचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय लाखे पाटील, अध्यक्ष अशोकराव आगलावे, कोषाध्यक्ष रवींद्र हुसे, संयोजन समितीचे सदस्य दिनेश फलके आदींनी मान्यवरांचे स्वागत केले. सूत्रसंचालन ॲड. शैलेश देशमुख यांनी केले.

या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष भास्कर अंबेकर, ॲड. ब्रम्हानंद चव्हाण, राजेश राऊत, राजेंद्र गोरे, राजेंद्र राख, सुभाष कोळकर, शरद देशमुख, अशोक उबाळे, चंद्रशेखर वाळिंबे, किरण गरड, ज्ञानेश्वर कदम, प्रा. राजेंद्र भोसले , सुरेश मुळे, अजिंक्य घोगरे, प्रसाद वाढेकर,अविनाश भंडे, रोहित देशमुख,सौ.विमलताई आगलावे,उषा आकात,सरला वाढेकर,भारती वाळिंबे,उज्वला घोगरे, नंदा पवार, मनिषा भोसले, सविता देशमुख, जगत घुगे, गणेश चांदोडे यांच्यासह महिला व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# रंगांच्या रेषांतून उमटला स्त्रीशक्तीचा हुंकार; विद्यार्थिनींनी साकारले ऑपरेशन सिंदूर

श्री गणेश महासंघाच्या खो खो, रांगोळी स्पर्धा, व्यसनमुक्ती शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**जालना । प्रतिनिधी -** गणेशोत्सवाच्या उत्सवी वातावरणात श्री गणेश महासंघातर्फे सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांना विशेष महत्त्व देण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून गुरुवार, दि. ४ सप्टेंबर रोजी ऑपरेशन सिंदूर या ज्वलंत आणि समाजाभिमुख विषयावर रांगोळी स्पर्धा तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात करण्यात आले होते. विद्यार्थिनींनी रांगोळीतून साकारलेले ‘ऑपरेशन सिंदूर’चं समाजभान अत्यंत लक्षवेधी ठरले.

सरस्वती भुवन विद्यालयात रंगलेली रांगोळी स्पर्धा केवळ रंगांची मांडणी नव्हती, तर समाजाच्या मनाला विचार करायला लावणारा संदेश होता. ऑपरेशन सिंदूर या विषयाने महिलांच्या सन्मानाचे, नारीशक्तीच्या जागृतीचे प्रतीक या रांगोळ्यांतून साकार झाले. ४० विद्यार्थिनींनी आपल्या कल्पकतेतून स्त्रीशक्तीच्या विविध रूपांची रांगोळीतून मांडणी करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

रेल्वे स्टेशन रोडवरील जिल्हा परिषद शाळेत घेतलेल्या खो-खो स्पर्धेला देखील उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुलींचे तीन आणि मुलांचे तीन असे एकूण सहा संघ या स्पर्धेत उतरले असून, अंतिम सामना शुक्रवारी रंगणार आहे. या उपक्रमांचे उद्घाटन श्री गणेश महासंघाचे अध्यक्ष रोहित भुरेवाल यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थापक पारसनंद यादव, युवा नेते सुनील खरे, महासचिव मनीष नंद, कार्याध्यक्ष ड. महेश धन्नावत, उपाध्यक्ष विकी वाघमारे, शुभम काटकर, दुर्गेश काटोठीवाले, सुनील नंद, योगेश देवावाले, प्रणय सारस्वत, रुपेश भगत, सचिन भुरेवाल, विजय भुरेवाल, कपिल भुरेवाल, हरीश भगत, अर्जुन दहाडे, भूषण नंद, अर्जुन गोरक्षक, गौरव बोरा आदी मान्यवर उपस्थित होते.

बुधवार, दि. ३ सप्टेंबर रोजी बडी सडकवरील रुबी हॉस्पिटलमध्ये व्यसनमुक्ती मार्गदर्शन व थायरॉईड निदान शिबिर घेण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन सदर बाजार ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी मानसोपचार तज्ञ डॉ. सुरज सेठीया यांनी व्यसनमुक्तीबाबत मार्गदर्शन केले तर डॉ. राजेश सेठीया यांनी थायरॉईडची कारणे, लक्षणे व उपचारांविषयी माहिती दिली.






जालना शहरातील राजेंद्र प्रसाद रोडसह विविध भागात गणेश मंडळांनी आकर्षक गणपतींची मुर्ती वेगवेगळ्या रुपात असून ही पाहण्यासाठी मोठी गर्दी होत आहे.

# सेवा पंधरवाडा अंतर्गत भारतीय जनता पार्टीच्या एकाच दिवसात २१ शाखांचे उदघाटन

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टी, जालना महानगर जिल्ह्यातील संघटनात्मक कार्यात मोठा टप्पा गाठला जात असून जालना शहरात एकाच दिवशी सेवा पंधरवाडा अंतर्गत भारतीय जनता पार्टीच्या रामनगर, भिमनगर, गांधी नगर, आरेफ कॉलनी, सुवर्णकार नगर, तसेच इतर महत्त्वाच्या परिसरामध्ये २१ शाखांचे उदघाटन करण्यात येणार आहे. या शाखांचे उदघाटन जालना जिल्हा लोकनेते माजी केंद्रीय राज्यमंत्री श्री. रावसाहेब पाटील दानवे, मा.आ.कैलासजी गोरंट्याल यांच्या शुभहस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे राहणार आहे. यावेळी माजी नगराध्यक्षा संगीताताई गोरंट्याल, भाजपा युवा नेते अक्षय गोरंट्याल यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

सदरील २१ नवीन शाखांचे उदघाटन दिनांक ०५ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १.३० वाजता होणार आहे. या कार्यक्रमामुळे शहरातील विविध भागांतील कार्यकर्त्यांना संघटनात्मक बळ मिळणार असून, यावेळी शाखा उदघाटनापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते घनतृप्त हनुमान मंदिर पर्यंत भव्य मोटारसायकल रैली काढण्यात येणार आहे.

यावेळी सदरील कार्यक्रमास भाजपा प्रदेश निमंत्रित सदस्य रामेश्वर पाटील भांदरगे, राजेशजी राऊत, विजय कामड, विमलताई आगलावे, माजी महानगर अध्यक्ष अशोक पांगारकर, सतीश जाधव, जालना ग्रामीण जिल्हाध्यक्षा संध्याताई देठे, महिला मोर्चा महानगर जिल्हाध्यक्षा शुभांगीताई देशपांडे, पूर्व जालना मंडळ अध्यक्ष अमोल धानुरे, नवीन जालना मंडळ अध्यक्ष सुनील खरे, जुना जालना मंडळ अध्यक्ष महेश निकम, ग्रामीण मंडळ तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, माजी नगरसेवक गणेश जल्लेवार, विनाताई सामलेटी, संजयजी भगत, सखुबाई पणबिसरे, देविदास जाधव, बालाजी रोडे, संजयजी पाखरे, सोनू सामलेटी आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

तरी सदरील भव्य मोटारसायकल रैली व शाखा उदघाटन प्रसंगी जालना महानगर जिल्ह्यातील सर्व भाजपचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आजी-माजी नगरसेवक, जि.प.प.स. सदस्य यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्ह्याच्या वतीने करण्यात येत आहे.

## माहोरा येथे तान्हाजी नगर मित्र मंडळाच्या वतीने महाप्रसाद कार्यक्रम संपन्न

**माहोरा । प्रतिनिधी -** येथील तान्हाजी नगर मित्र मंडळाच्या वतीने माहोऱ्याचा विघ्नहर्ता गणपती बाप्पा बसविलेले आहे. गणपती बाप्पा विसर्जन जवळ आल्यामुळे मंडळाने महाप्रसाद आयोजन केले होते. प्रसाद वाटप तीन वाजे पासून सुरवात करण्यात आली होती. तसेच परिसरातील नागरिकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. प्रसादासाठी गणेश भक्त तसेच सर्व जाती धर्माचे लोक उपस्थित होते. त्यामुळे ऐकतेची भावना दिसून आली. प्रसाद बनवण्या पासून ते संपूर्ण प्रसाद वाटप होईपर्यंत सर्व जाती धर्मातील महिला, पुरुष परिश्रम घेतांना पाहावयास मिळाले.



उल्लेखनीय बाब म्हणजे तान्हाजी मित्र मंडळा मध्ये सुद्धा सर्व जाती धर्माचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्यामध्ये आहेत. म्हणून हे मंडळ आदर्श घेण्यासारखे आहे. महाप्रसादाचा कार्यक्रम शांततेत पार पडला आहे.

## शिक्षक दिनानिमित्त सत्यशोधक विद्यालयात इतिहास तज्ञांचे मार्गदर्शन



**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** मानव विकास व पूर्ण निर्माण संशोधन संस्था औरंगाबाद संचलित सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव तालुका भोकरदन जिल्हा जालना येथे शिक्षक दिनानिमित्त इतिहास तज्ञांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते याप्रसंगी बाबुरावजी काळे वरिष्ठ महाविद्यालय अजिंठा येथील प्राचार्य श्री.गणेश गुजराव वाघ सर हे मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते त्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना इतिहासातील बारीक-सारीक खाचक खोचक गोष्टी पटवून देण्याचा प्रयत्न केला तसेच इतिहासाचे महत्त्व आपल्या जीवनामध्ये काय आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केला यानिमित्त विद्यालयातील इतिहास शिक्षिका श्रीमती लकडे एस एस यांनी मार्गदर्शन आयोजित केले. अध्यक्षस्थानी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेतील पर्यवेक्षक श्री पठाण आय एस यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री कंकाळ एन एम यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे आभार श्री सुलताने डि के यांनी केले.तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मार्गदर्शन लाभले.

# निर्यात वृद्धीसाठी प्रयत्न करावे - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना । प्रतिनिधी -** केंद्र शासनाच्या 'जिल्हा निर्यात केंद्र' या उपक्रमास प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र व राज्य शासन दोघेही एकत्र काम करत आहेत. हा उपक्रम प्रत्येक जिल्ह्याची निर्यात क्षमता वाढवण्यावर केंद्रित असणार आहे. जेणेकरून स्थानिक उत्पादनांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्थान मिळेल तसेच आर्थिक विकासाला चालना मिळेल. जिल्ह्यातील निर्यात वाढीसाठी विविध केंद्र व जिल्हा कार्यालय, औद्योगिक संघटना, निर्यात परिषदा, निर्यात सल्लागार इत्यादी यांच्याशी सातत्याने पाठपुरावा करून निर्यात वृद्धीसाठी प्रयत्न करावेत असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित जिल्हा निर्यात प्रचालन परिषद समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक योगेश सारणीकर,एन एच एल एम एल व्यवस्थापक विकास मलिक, एम.आय.डी.सी.चे क्षेत्र व्यवस्थापक श्रीमती सुषमा नगरदेवळेकर, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक तेजल क्षिरसागर, लघु उद्योग भारतीचे सतीष भक्कड, जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक मंगेश केदार, एस.आर जे. पित्ती कंपनीचे संचालक विनीत पित्ती, करण गोयल, मेटारोलचे शुभम सोनी, भाग्यलक्ष्मी रोलिंग मिलचे नितीन काबरा, विनोदराय इंजिनिअरिंग कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक सुनिल रायठ्ठा, कलश सिडसचे सुनिल बियाणी यांच्या सह अन्य सदस्यांची उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल म्हणाल्या की, जिल्ह्यात निर्यात व उत्पादन क्षेत्रास प्रोत्साहन देण्यासाठी व रोजगार निर्मितीचे लक्ष साध्य करण्यासाठी तसेच निर्यात वाढीकरिता तसेच जिल्ह्याला उत्तरदायी बनविण्यासाठी केंद्र शासनाच्या जिल्हा निर्यात केंद्र या उपक्रमास प्रोत्साहन देण्यात येत आहे. या उपक्रमाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध पाऊले उचलली जात आहेत, जसे की निर्यात प्रोत्साहन समितींची स्थापना, पायाभूत सुविधांचा विकास, आणि स्थानिक उद्योगांना जागतिक बाजारपेठेशी जोडणे आदी उपक्रम राबविण्यात येणार आहे.

या बैठकीत जिल्हाच्या निर्यात वृद्धीसाठी दहा कलमी कृती आराखडा अंमलबजावणी बाबत तपशिलवार आढावा घेण्यात आला. या दहा कलमी कृती आराखड्यात वार्षिक दुहेरी अंकी निर्यात वाढीसाठी जिल्हास्तरीय निर्यात धोरण आराखडा, जिल्हास्तरीय निर्यात धोरण आराखड्यामध्ये समाविष्ट केलेल्या उपक्रमांचे नियमित निरीक्षण आणि अंमलबजावणी, निर्यात बास्केटमध्ये विविधता आणण्यासाठी संभाव्य निर्यात उत्पादनांची ओळख, प्रतिष्ठित व्यवस्थापन, डिझाइन आणि संशोधन आणि विकास संस्थांशी संस्थात्मक संबंध, विविध जागतिक ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मबद्दल एमएसएम ईंना शिक्षित करण्यासाठी कार्यशाळा/कार्यक्रम किंवा प्रदर्शन,निर्यातदारांना सुविधा देण्यासाठी खरेदीदार विक्रेत्यांची तिमाही बैठक, गुणवत्ता नियंत्रण आणि प्रमाणनासाठी प्रयोगशाळा स्थापन करणे, निर्यात प्रोत्साहन परिषद (ईपीसी), प्रादेशिक डीजीएफटी यांच्याशी सक्रिय सहभाग, मासिक डीईपीसी बैठकीचे तपशील, जिल्हा-विशिष्ट उत्पादनांसाठी गुणवत्ता आणि सुरक्षा मानके, मूल्यवर्धन आणि तंत्रज्ञानाच्या वापरावर गुंतलेल्या उद्योजकांची क्षमता निर्माण करणे या बाबींचा आढावा घेण्यात आला.

तसेच एक जिल्हा एक उत्पादनासाठी सात-कलमी कृती आराखडा याविषयी आढावा घेण्यात आला यात 'एक जिल्हा एक उत्पादन' सुविधा केंद्राची स्थापना करणे, सत्यापित विक्रेते/निर्यातदारांची ओळख पटलेली यादी तयार करुन जिल्ह्यामधून एक जिल्हा एक उत्पादने सुचवणेबाबत आवाहन करण्यात आले. जिल्हा निर्यात योजनेची तयारी आणि अंमलबजावणीचे निरीक्षण करणे, भगिनी जिल्हा संकल्पना अंमलबजावणी करणे, उद्योजकांचे प्रशिक्षण सुनिश्चित करणे, सर्व क्षेत्रातील व्यक्तींचा सक्रिय सहभाग नोंदविणे यासह अन्य महत्त्वाच्या मुद्दांवर यावेळी आढावा घेण्यात आला.

यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी गुणवत्ता तपासणी विषयक प्रश्न जिल्हास्तरावर निकाली काढणेबाबतचे ही निर्देश दिले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.